(2)

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** लातूर **P.S.(ठाणे):** औसा

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0204 **Year (वर्ष):** 2024

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 18/05/2024 23:35

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शनिवार

**Time Period (कालावधी):** पहर 5

**Date From (दिनांक पासून):** 18/05/2024

**Date To ( दिनांक पर्यंत):** 18/05/2024

**Time From (वेळेपासून):** 14:46 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 14:55 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 18/05/2024 **Time (वेळ):** 22:58 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 029

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 18/05/2024 22:58 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पूर्व, 2 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** आौसा

(c) **In case, outside the limit of this Police Station, then**
(या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): पवनकुमार नारायणप्रसाद पांडे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1985

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | रा भुसार वेस, महाराज गल्ली,ता औसा जि लातूर,औसा,लातूर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | रा भुसार वेस, महाराज गल्ली,ता औसा जि लातूर,औसा,लातूर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.):

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | सतिष उत्तमराव कांबळे | | | 1. रा हंगरगा, ता निलंगा जि लात, औसा,लातूर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500रुपये दराचे 4नोटा | 2,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

2,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

दिनांक 18/05/2024

फिर्याद

मी पवनकुमार नारायणप्रसाद पांडे, वय 39 वर्षे, व्यवसाय खाजगी नोकरी, रा. भुसार वेस, महाराज गल्ली, ता. औसा जि. लातूर मो.नं.9860074950

समक्ष फिर्याद देतो की, मी दिनांक 17/05/2024 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर येथील पोलीस उपअधीक्षक संतोश बर्गे साहेब व पोलीस निरीक्षक अन्वर मुजावर साहेब यांना समक्ष भेटुन माझी एका लोकसेवकाविरुध्द लाच मागणीची तक्रार असल्याचे तोंडी सांगितली. त्यावरून त्यांनी मला दि.18/05/2024 रोजी सकाळी ला.प्र.वि. कार्यालय, लातूर येथे सापळा कार्यवाही करण्याचे अनुशंगाने येण्यास सांगीतले.

त्याप्रमाणे आज दिनांक 18/05/2024 रोजी सकाळी 09.30 वा. सुमारास ला.प्र.वि.कार्यालय लातूर येथे हजर आलो. तेथे पोलीस उपअधीक्षक श्री बर्गे साहेब, पोलीस निरीक्षक मुजावर साहेब हे त्यांचे कर्मचारी व दोन पंचासह हजर होते. त्यांनी मला सापळा पथकातील सदस्य व पंचांची ओळख करून देवुन त्यांचे समक्ष माझे नाव, गाव विचारले असता मी त्यांना वरीलप्रमाणे माझे नाव सांगुन तोंडी तक्रार सांगुन सविस्तर लेखी तक्रार दिली, ती खालीलप्रमाणे.

"मी वरीलप्रमाणे राहणारा असुन खाजगी कंपनीमध्ये अकाऊंटन्ट म्हणुन काम करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतो. माझे वडीलांचे नावे मौजे औसा येथे सर्व्हे नं. 347-अ-2 मध्ये 1.25 हेक्टर षेतजमीन असुन षेतातील विहीरीचे पंपाकरीता नविन वीज जोडणी कनेक्षन मिळणेकरीता मी एमएसईबी सबस्टेषन, औसा येथे रितसर अर्ज केला होता. त्या अर्जावर मला 51829992 असा अर्ज क्रमांक मोबाईलवर एसएमएस व्दारे प्राप्त झाला आहे.

त्यावरून मी सबस्टेषन औसा येथे गेल्यानंतर आमचे भागासाठी तंत्रज्ञ/वायरमन श्री कांबळे हे असल्याचे समजले. त्यावर मी त्यांची भेट घेवुन वीज जोडणीबाबत चर्चा केली असता, त्यांनी मला नविन वीज जोडणीच्या डिमांडसाठी 15,000/-रू. खर्च लागतो. तुम्ही माझेकडे 15,000/-रू. जमा करा. त्याची रितसर पावती नंतर मी तुम्हाला आणुन देतो, असे सांगीतले. त्यावर मी त्यांना दि.01/12/2023 रोजी 13,000/-रू. व दि.06/12/2023 रोजी 2,000/-रू. असे एकुण 15,000/-रू. माझे कोटक महिंद्रा बँक, षाखा-बिबेवाडी, पुणे येथील बँक खात्याषी सलग्न असलेला फोन नं.9860074950 चे गुगल पे अॅपवरून ऑनलाईन पध्दतीने तंत्रज्ञ कांबळे यांचे गुगल पे असलेला फोन नं.7498235659 वर पाठविले होते. त्यानंतरचे कालावधीमध्ये माहे फेब्रुवारी/2024 मध्ये तंत्रज्ञ कांबळे यांची बदली दुसÚया ठिकाणी झाली आहे. तंत्रज्ञ कांबळे यांनी माझे वीज जोडणीचे काम केले नाही अगर माझे पैसे परत केलेले नाहीत, म्हणुन मी दि.16/05/2024 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर येथे मेलआयडीवर तक्रारी अर्ज सादर केलेला आहे.

दि.17/05/2024 रोजी मला ला.प्र.वि. लातूर येथुन फोन आला होता म्हणुन मी ला.प्र.वि. लातूर येथील डीवायएसपी श्री संतोश बर्गे साहेब यांची भेट घेवुन सर्व हकीकत सांगीतली. तेव्हा त्यांनी संबंधीत लोकसेवक तंत्रज्ञ कांबळे यांना फोन करण्यास सांगीतलेवरून मी माझे मोबाईल नंबर 9860074950 वरून तंत्रज्ञ कांबळे यांचा मोबाईल नंबर 7498235659 वर संपर्क केला असता, संबंधीत लोकसेवक यांनी माझे वर नमुद कामासाठी आणखीन उद्या तुळजापुर टी-पॉईट, औसा येथे येवुन भेटा व येतेवेळी 3,000/-रूपये घेवुन या, मी तुमचे काम करून देतो असे म्हणाले. तंत्रज्ञ श्री कांबळे यांनी मागीतलेली रक्कम ही लाच असल्याचे माझी खात्री झाल्याने मी त्यांचेविरूध्द तक्रार देण्यासाठी आलो आहे. संबंधीत लोकसेवक यांना लाच देण्याची माझी इच्छा नसुन माझे त्यांचेषी काही वैर नाही.'' अषा आषयाची मी दिलेली तक्रार सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक अन्वर मुजावर साहेब व पंचांनी वाचुन पाहुन त्यावर स्वाक्षÚया केल्या आहेत.

पोलीस निरीक्षक अन्वर मुजावर साहेब यांनी मी दिलेल्या तक्रारीच्या अनुशंगाने तंत्रज्ञ/वायरमन कांबळे यांनी मला माझ्ो वरील नमुद काम करून देण्याकरीता म्हणुन लाचेची मागणी केली आहे अगर कसे? यांची पडताळणी करुन

ती ध्वनीमुद्रीत करण्याचे ठरवुन त्यांचेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर बाबत मला व पंचांना माहिती सांगुन, ते कोरे असल्याचे खात्री करुन देवुन डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये सिलबंद पाकीटातील नविन कोरे मेमरीकार्ड टाकुन माझे व दोन्ही पंच तसेच पोलीस निरीक्षक अन्वर मुजावर साहेब यांचे वक्तव्य ध्वनिमुद्रीत करुन पडताळणी करण्याचे ठरवुन सापळा कार्यवाहीबाबत मला व पंचांना तसेच सापळा पथकातील सदस्य यांना योग्य त्या सुचना दिल्या.

त्यानंतर पोलीस निरीक्षक अन्वर मुजावर साहेब यांनी मला योग्य त्या सुचना देवून पोकॉ/1400 कच्छवे यांचे मार्फतीने दि.18/05/2024 रोजी 13.53 वा. डिजीटल व्हॉईस रेकॉर्डचे बटन चालु करुन माझ्या गळ्यात अडकावुन तत्रंज्ञ कांबळे यांनी सांगीतलेल्या ठिकाणी तुळजापुर टि-पॉईंट, औसा येथे जाण्यास सांगितले. त्यानंतर मी व पंच क्रमांक 1 मुंडे असे तुळजापुर टि-पॉईंट, औसा येथे जावुन पिस्ता रंगाचा फुल बाहयाचा षर्ट व काळ्या रंगाची पॅन्ट घातलेली व्यक्ती हे तंत्रज्ञ/वायरमन कांबळे असल्याचे पंचास ईषा-याने सांगुन त्यांची पंचासमक्ष भेट घेतली असता त्यांनी माझ्ो वरील नमुद कामाच्या अनुशंगाने पंचासमक्ष तंत्रज्ञ कांबळे यांचेषी समोरासमोर चर्चा केली. चर्चे दरम्यान मी म्हणालो... रामराम... दर्षन दुर्लभ झाले तुमचे... त्यावर तत्रंज्ञ कांबळे म्हणाले... तिथं थांबलो... तिथं एक लाईनमन आला... त्यावर मी म्हणालो... हं.... अहो वडील रागवायलेत मला...अं... त्यावर तत्रंज्ञ कांबळे म्हणाले... झालं थोडं... त्यावर मी म्हणालो ... झालं की आता... डिसेंबर मध्ये पैसे दिलेत तुम्हाला... त्यावर तत्रंज्ञ कांबळे म्हणाले... थोडे दिवस... त्यावर मी म्हणालो ... एक तर तुमची बदली होवुन गेलो तुम्ही तिकडं... त्यावर तत्रंज्ञ कांबळे म्हणाले... नाही... येणाराव मी दोन तारखेला...त्यावर मी म्हणालो.... वडील विचारत होते काय, कधी होणारय काम... कधी विज कनेक्षन मिळणारय पावती पण दिलं नाही...तुम्ही काय म्हणलो होतो की, आठवडाभरात पावती देतो म्हणुन...त्यावर तत्रंज्ञ कांबळे म्हणाले... माझेमुळं लई तकलीफ झाली... ओ आण्णा चहा द्या ओ... त्यावर मी म्हणालो ...10 नोव्हेंबरला फॉर्म भरलाय, डिसेंबरमधी तुम्हाला 15 हजार रूपय दिलेत... तुमच्या फोन पे वर पाठविलेत पैसे मी... त्यावर तत्रंज्ञ कांबळे म्हणाले... तुमच्याकडं कोणतीच चुक नाही... मी सरळ सरळ... त्यावर मी म्हणालो... हं... त्यावर तत्रंज्ञ कांबळे म्हणाले.... डिमांड आता वाढलेलं हाय.... बंदबी झालं म्हणायल्यात... आपलं आपण काढुन घेवुन तुम्हाला 100 टक्के पावती देतो... थोडं बहुत काय झालं तर द्या... काढुन देतो तुम्हाला...तेवढं विष्वासानं तुम्ही बोलुन घेवुन मला जे म्हणलो कनी...त्यावर मी म्हणालो... आता अक्षरषहा... काल मी मित्राला बोललो.... मला पैसे लागणारेत म्हणुन... काल तुम्ही फोन पे करा म्हणलो... त्यावर तत्रंज्ञ कांबळे म्हणाले....हं... त्यावर मी म्हणालो...माझे अकाउंटला एकच रूपाया हाय फक्त... खोटं बोलत नाही मी...त्यच्यामुळं मी म्हणलं उद्या मला पैसे लागणारेत... तर त्यला दे म्हणलं पैसे... म्हणजे माझं काम कधी होईल मग... अॅटलीस्ट पावती किंवा कनेक्षन दोन्ही पैकी एक पाहिजे मला... त्यावर तत्रंज्ञ कांबळे म्हणाले....तुम्हाला एक लास्ट सांगतो... तुम्हाला दोन तारखेला ह्याच टाईमाला माझेकडुनच घेवुन टाकायची पावती.... त्यावर मी म्हणालो.. नाही मी तुमच्या एका षब्दावर तुम्हाला पैसे ट्रान्सफर केले...आता तुम्हाला खोटं बोलत नाही... आता त्यला बोलवतो की... काल फोन पे करा म्हणलतो... काहीच नाही माझेकडं....त्यावर तत्रंज्ञ कांबळे म्हणाले....आता त्यांच्याकुन घ्या... मला टाका नंतर घंटा दिड घंट्यानं... त्यावर मी म्हणालो... आता पाहिजे असतील तर... त्यावर तंत्रज्ञ कांबळे म्हणाले...मी तुम्हाला एकही रूपया आगाव घेतला नाही.. मी फक्त तुमचे डिमांडचे पैसे घेतले...त्यावर मी म्हणालो... मग आता कधी पर्यंत काम होईल... त्यावर तंत्रज्ञ कांबळे म्हणाले...तुम्हाला दोन तारखेला 100 टक्के मिळुन जाईल... दोन तारीख जर गेली तर तीन तारखेला माझेकडुन डबल पैसे घ्यायचे...फक्त एवढच की आता थोडसं मला खालीवरी काहीतरी करावं... त्यावर मी म्हणालो... आता खाली?... त्यावर तंत्रज्ञ कांबळे म्हणाले...जेवढं... त्यावर मी म्हणालो... खालीवरी म्हणजे?... त्यावर तंत्रज्ञ कांबळे म्हणाले ... जेवढा विष्वास तुम्ही टाकलो तेवढयाच विष्वासानं काम करून घ्या म्हणजे दुसरं अजुन काय बोलायचं... त्यावर मी म्हणालो... खाली वरी म्हणजे काय आता?... त्यावर तंत्रज्ञ कांबळे म्हणाले... दोन तीन हजार रूपय... बसं दुसर का्ाहीच.... एक रूपया कुणाला नाही... त्यावर मी म्हणालो... दोन हजार रूपयं... घेवुन येवु का मग मित्राकुन?.... कारण त्यला म्हणलतो पैसे दे म्हणुन... त्यावर तंत्रज्ञ कांबळे म्हणाले... या जावुन.. असे म्हणाल्याने मी व पंच क्रमांक 1 मुंडे असे तेथुन निघून सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी गायत्री हॉटेल जवळ, औसा येथे 14ः16 वाजताचे सुमारास आलोे असता पोकॉ कच्छवे यांनी माझेकडील व्हाईस रेकॉर्डर घेवून बंद केले. पोलीस निरीक्षक मुजावर साहेब यांनी माझ्या समक्ष पंच क्रमांक 1 मुंडे यांना लाचेची मागणीच्या अनुशंगाने माझ्यात व तंत्रज्ञ कांबळे यांच्यात काय बोलणे झाले याबाबत विचारणा केली असता पंच क्रमांक 1 मुंडे यांनी मी वर नमुद केल्याप्रमाणे हकीकत सांगितली. आम्ही सर्वांनी व्हॉईस रेकॉर्डर हाताळणारे पोलीस कर्मचारी कच्छवे यांचे मार्फतीने डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन माझ्यात व तंत्रज्ञ कांबळे यांच्यात झालेले संभाशण ऐकुन ते पंच क्रमांक 1 मुंडे यांनी सांगितलेल्या हकीकतीप्रमाणे असल्याचे खात्री केली. वरील संभाशणावरून तंत्रज्ञ कांबळे यांनी वर नमुद कामासाठी म्हणुन माझ्याकडे 3,000/- रुपये अषी लाचेची स्वतः मागणी करुन लाचेची रक्कम घेवुन येण्यास सांगितल्याने व मी त्यास 2,000/-रू. घेवुन येतो असे

कार्यालय ... औसा ... मा.

सांगीतल्याने आम्ही सर्वानुमते त्यांचे विरुध्द 2,000/- रुपये लाचेची सापळा कार्यवाही करण्याचे ठरविण्यात आले. सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक अन्वर मुजावर साहेब यांनी मला लोकसेवक तंत्रज्ञ कांबळे यांना देण्यासाठी लाचेची रक्कम हजर करणेबाबत कळविले असता मी माझेकडील 500/-रुपये दराच्या 04 भारतीय चलनी नोटा असे एकुण 2,000/-रुपये समक्ष हजर केले. त्यावेळी पोलीस निरीक्षक अन्वर मुजावर साहेब यांनी मला व पंचाना अॅन्थ्रासीन पावडरचा वापर, गुणधर्म याबाबत माहिती व प्रात्यक्षीक करुन दाखविले. मी हजर केलेल्या नोटांना पोकॉ/1687 जाधव यांनी अॅन्थ्रासीन पावडर लावुन माझ्या अंगातील पॅन्टच्या मागील उजव्या बाजुच्या खिषामध्ये ठेवुन लाचेची रक्कम दिल्यानंतर आपल्या डोक्यावरील रूमाल काढुन हातात घेणे बाबतचा सुनियोजीत ईषारा करणेबाबत सांगण्यात आले. पोलीस निरीक्षक मुजावर साहेब यांनी मला, दोन्ही पंच व सापळा पथकातील सदस्य यांना पुढील सापळा कार्यवाही बाबत पुन्हा सुचना दिल्या. पोलीस निरीक्षक मुजावर साहेब यांच्या सुचनेनुसार पोलीस कर्मचारी कच्छवे यांनी व्हाईस रेकॉर्डर 14ः42 वा. चालु करुन माझ्या गळयात आडकावुन दिले. त्यानंतर मी व पंच क्रमांक 1 मुंडे असे तुळजापुर मोड येथील षिंदे, स्पेषल राईस सेंटर दुकानासमोर जावुन लोकसेवक श्री कांबळे यांची भेट घेतली असता, लोकसेवक तंत्रज्ञ कांबळे म्हणाले...उषीर झाला बाबा... त्यावर मी म्हणालो.... हं... नाही एटीएम...हे हे दोन हजार घ्या.... पण लाईटीच काम करा बरं... असे म्हणुन 500/-रुपये दराच्या 04 भारतीय चलनी नोटा असे एकुण 2,000/-रुपये लोकसेवक तंत्रज्ञ कांबळे यांचे समक्ष धरले असता लोकसेवक कांबळे यांनी माझेकडुन 14.46 वाजण्याच्या सुमारास पंचासमक्ष सदरची लाचेची रक्कम ही त्यांच्या उजव्या हाताने स्वीकारून पिस्ता रंगाच्या फुल बाहयाच्या षर्टच्या डाव्या बाजूच्या खिषामध्ये ठेवली... नंतर लोकसेवक तंत्रज्ञ कांबळे म्हणाले... तुम्हाला 100 टक्के... हजार झालेत बरोबर...100 टक्के काम करून देतो... तुम्ही टेन्षन नका घेवु... फक्त मला एक तारखेला रिमाईंडर करा....त्यावर मी हं... असे म्हणुन नियोजीत लाचस्विकृतीचा इषारा केला. त्यानंतर लगेच पोलीस उपअधीक्षक संतोश बर्गे साहेब व पोलीस निरीक्षक अन्वर मुजावर साहेब हे पंच क्र. 02 जगताप व सापळा पथकातील सदस्यासह सदर ठिकाणी आले. माझेकडील व्हाईस रेकॉर्ड पोलीस कर्मचारी कच्छवे यांचेकडे दिले ते त्यांनी घेवुन बंद केले. त्यावेळी पोलीस निरीक्षक मुजावर साहेब यांनी पंच क्रमांक 1 मुंडे यांना लाचेची रक्कम कोणी स्विकारली? याबाबत विचारणा केली असता पंच क्रमांक 1 मुंडे यांनी समोर पिस्ता रंगाचा फुल बाहयाचा षर्ट व काळ्या रंगाची पॅन्ट घातलेली व्यक्ती हे तंत्रज्ञ कांबळे असुन त्यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम ही त्यांच्या समोर उजव्या हाताने स्विकारुन पिस्ता रंगाच्या फुल बाहयाच्या षर्टच्या डाव्या बाजूच्या खिषामध्ये ठेवली असलेबाबत सांगितले. मी वर सांगीतलेल्या हकीकतीप्रमाणे मिळती जुळती हकीकत पंच क्रमांक 1 मुंडे यांनी सांगीतली. त्यावेळी सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक मुजावर साहेब यांनी त्यांचेकडील ओळखपत्र लोकसेवक तंत्रज्ञ कांबळे यांना दाखवून त्यांचे नाव गांव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव सतिष उत्तमराव कांबळे, वय 38 वर्शे, पद तंत्रज्ञ/वायरमन, वर्ग-3, नेमणुक महावितरण कार्यालय षाखा-बेलकुंड, ता. औसा जि. लातूर रा. हंगरगा ता. निलंगा जि. लातूर हा.मु. श्री अविनाष पाटील यांचे घरी, बॅंक कॉलनी रोड, आनंद नगर, निलंगा, ता.जि. लातूर असे असल्याचे सांगितले. पोलीस निरीक्षक मुजावर साहेब यांनी पंच क्रमांक 2 जगताप यांचे हस्ते लोकसेवक कांबळे यांच्या जवळील लाचेची रक्कम काढुन घेवुन पंच क्रमांक 1 मुंडे यांचे मार्फतीने सापळा कार्यवाही दरम्यान लिहुन घेण्यात आलेल्या नोटांचे वर्णन व नंबरषी पडताळून पाहीले असता ते एकच असल्याचे निदर्षनास आले. त्यानंतर लोकसेवक कांबळे यांना ताब्यात घेवुन तेथील आवष्यक ती सापळा कार्यवाही करुन सदर ठिकाणी गर्दी होत असल्याने पुढील कार्यवाही करणेकरीता घटनास्थळावरुन रवाना होवून लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, लातूर येथे येवुन पुढील कार्यवाही पुर्ण केली.

तरी यातील लोकसेवक सतिष उत्तमराव कांबळे, वय 38 वर्शे, पद तंत्रज्ञ/वायरमन, वर्ग-3, नेमणुक महावितरण कार्यालय षाखा-बेलकुंड, ता. औसा जि. लातूर रा. हंगरगा ता. निलंगा जि. लातूर हा.मु. श्री अविनाष पाटील यांचे घरी, बॅंक कॉलनी रोड, आनंद नगर, निलंगा, ता.जि. लातूर यांनी माझे वडीलांचे नावे मौजे औसा येथील षेतीमध्ये विहीरीवरील पंपाकरीता नविन वीज जोडणी करून देण्याच्या कामासाठी म्हणुन मी त्यांना दि.01/12/2023 रोजी 13,000/-रू. व दि.06/12/2023 रोजी 2,000/-रू. असे एकुण 15,000/-रू. गुगल पे व्दोर ऑनलाईन पध्दतीने दिलेले असतांनाही आज दि.18/05/2024 रोजी पंचासमक्ष आणखीन 3,000/-रू. लाचेची मागणी करून तडजोडीअंती 2,000/-रूपये लाचेची रक्कम तुळजापुर टी-पॉईंट, औसा येथील षिंदे, स्पेषल राईस सेंटर दुकानासमोर 14ः46 वा. चे सुमारास पंचासमक्ष स्वतः स्विकारली आहे. म्हणुन माझी सतिष उत्तमराव कांबळे, वय 38 वर्शे, पद तंत्रज्ञ/वायरमन, वर्ग-3, नेमणुक महावितरण कार्यालय षाखा-बेलकुंड, ता. औसा जि. लातूर यांचेविरुध्द कायदेषीर तक्रार आहे.

मी वर नमुदप्रमाणे सांगितलेली तक्रार ही पोकॉ जाधव यांनी लॅपटॉपवर टंकलिखीत केली असुन त्यांची प्रिंट

काढल्यानंतर ती मी वाचुन पाहिली. ती मी सांगितल्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष ही फिर्याद दिली.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

sunil hanmant rejitwad(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरींला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): sunil hanmant rejitw पो.ठा.अमलदार
**Rank**(पद): I (Inspector) पो.स्टे.औसा
**No.**(सं.):